# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय

**(जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण)**

---

**वाचा:** १. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५

२. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि. १४.०३.२०२०

३. अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक १४.०३.२०२०

४. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७

५. महाराष्ट्र शासन क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि.१४.०३.२०२०

६. या कार्यालयाचे आदेश (उपचीटनिस) क्र.२०२०/एमएजी/कक्ष-१/कावि-५५२ दिनाक:-२५.०३.२०२०

७. या कार्यालयाचे आदेश क्र.२०२०/आ.व्य./कावि-१७२ दिनाक:-०१.०४.२०२०

---

क्र.२०२०/आ.व्य./कावि-१८५ दिनाक:-०८.०४.२०२०

**<u>आदेश :-</u>**

**विषय:** राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.

**(जिल्ह्यातील बेघर, भिकारी, मनोरुग्ण ई. व्यक्ती बाबत.)**

ज्याअर्थी संदर्भीय शासन पत्रकान्वये शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दि नांक १३.०३.२०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. याबाबतची नियमावलीही तयार करण्यात आली असून स्वतंत्ररीत्या निर्गमित करण्यात आली आहे. त्याअन्वये जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यानुसार संदर्भ क्र. ६ अन्वये लातूर जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

त्याअर्थी **मी, जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, लातूर** कोरोना कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू असलत्यामुळे जिल्ह्यातील बेघर / भिकारी / मनोरुग्ण ई. व्यक्तीं यांची गैरसोय होऊ नये याद्दष्टीने त्यांच्याबाबत प्रचलित शासन नियमाप्रमाणे व्यवस्थापन करण्यासाठी जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.प. लातूर (८३२९१४०३७७) यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.प. लातूर यांनी त्यांच्या अधिनस्त अधिकारी/ कर्मचारी तसेच त्यांच्याकडील उपलब्ध संसाधनांचा यथोचित वापर करून जिल्ह्यातील बेघर / भिकारी / मनोरुग्ण ई. व्यक्तीं यांची गैरसोय होणार याची खबरदारी घ्यावी. याबाबतचा तपशीलवार दैनिक अहवाल तसेच जिल्हा नियंत्रण कक्षात प्राप्त होणा-या तक्रारीचा तपशील ई. चा दैनिक अहवाल निवासी उपजिल्हाधिकारी, लातूर यांचेकडे दररोज स. ११.३० वा. समक्ष सादर करावा.

या आदेशाचे उल्लंघन केल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ५१ तसेच भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे समजण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

सदरहू आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

(जी. श्रीकांत) भा.प्र.से.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण लातूर**

**I] प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर:-**

१. मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग औरंगाबाद

**II] प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव**

१. पोलीस अधीक्षक, लातूर

२. आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर

३. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. लातूर

४. सर्व उपविभागीय अधिकारी लातूर जिल्हा

५. सर्व तहसिलदार, लातूर जिल्हा

**III] प्रत अनुपालनास्तव:**

१. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.प. लातूर

Phone: (02382-220204, 224001) Fax: (02382-222330)